**ठळक बातम्या**

- भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या  वाटाघाटी पूर्ण
- नगरपालिका निवडणुकांच्या निकालातून भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष ठरला असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

**आणि**

- छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात नक्षल्यांचा शस्त्रास्त्र कारखाना उद्ध्वस्त, मोठा शस्त्रात्र साठा जप्त

**<><><><><>**

भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी आज दूरध्वनीवरुन चर्चा केल्यानंतर ही घोषणा केली. येत्या ३ महिन्यात त्यावर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. ऐकूया या कराराबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून

**.....व्हॉईस कास्ट. अंकिता**

*न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन गेल्या मार्चमधे भारतभेटीवर आले असताना उभय राष्ट्रात मुक्त व्यापार कराराबद्दलची बोलणी सुरु झाली होता. विक्रमी वेळात ती पूर्ण झाली आहेत.  या करारानुसार भारतातून न्यूझीलंडमधे निर्यात होणाऱ्या मालावर मोठ्या सवलती मिळणार असून भारतात नयूझीलंडमधून येणाऱ्या मालावरच्या शुल्कात  ७० टक्के सवलत असेल.व्हिसाचे नियम अधिक सुटसुटीत होतील,  दोन्ही देशात शेती, लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योग, शिक्षण इत्यादी क्षेत्रांमधे व्यापाराच्या संधी वाढतील आणि   पुढच्या ५ वर्षात  परस्पर*

*व्यापार दुप्पट होईल असा विश्वास दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला. या करारानुसार पुढच्या १५ वर्षांत न्यूझीलंडकडून भारतात सुमारे २० अब्ज डॉलर्स गुंतवणूक होईल अशी अपेक्षा आहे. मात्र न्यूझीलंडच्या दूध आणि दुधाच्या पदार्थांवर कोणतीही सवलत दिली जाणार नाही असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.*

**<><><><><>**

न्यूझीलंडबरोबरचा मुक्त व्यापार करार हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भारताच्या भूमिकेला पोषक ठरेल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. विविध देशांबरोबर परस्परपूरक संबंध वेगाने दृढ होत असल्याचं या करारावरुन दिसतं असं ते आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत म्हणाले....

**होल्ड बाईट- गोयल**

भारताचं आंतरराष्ट्रीय व्यापारातलं वाढतं वर्चस्वही या करारामुळे स्पष्ट होतं असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष आहे, हे नगरपालिका निवडणुकंच्या निकालातून स्पष्ट झालंय, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. त्यांनी आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी नागपूर जिल्ह्यातल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांशी संवाद साधला. यावेळी आयोजित वार्ताहर परिषदेत फडनवीस यांनी सांगितलं, की 2017 मध्ये भाजपाच्या नगरसेवकांची संख्या पंधराशे होती, ती या निवडणुकीत ३ हजाराच्या वर गेली आहे. म्हणजे ही संख्या वाढ दुपटीनं वाढली आहे. नागपूर जिल्ह्यात 27 पैकी 22 नगराध्यक्ष भाजपाचे आहेत. या सर्व सत्तावीस शहरांना आपण मॉडेल शहर म्हणून विकसित करणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

नागपूर जिल्ह्यातल्या सावनेर रामटेक नगरपालिका काँग्रेस मुक्त केल्या, तर कामठी शहरात नगरपंचायत स्थापन झाल्यापासून पहिल्यांदाच कमळ फुललं, असे अनेक विक्रम या निवडणुकांनी केले असं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर झाले.

या निवडणुकीत भाजपा ११७ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला एकनाथ शिंदे यांच्यानेतृत्वात शिवसेना पक्षानं ५३, आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं ३७ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला २८, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ९ जागा मिळाल्या तर अपक्ष आणि इतरांना ३७ जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्र विकासाच्या बाजूने खंबीरपणे उभा असल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत महायुतीच्या विजयाबद्दल अभिनंदन करत जनतेचे आभार मानले.

तीन नगराध्यक्ष पदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

**<><><><><>**

देशभरातल्या आयआयटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचं देशाच्या विकासात आणि प्रगतीत मोठं योगदान असून भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी त्यांचं ज्ञान हे शक्तिशाली माध्यम असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज मुंबईत आयआयटी पवई इथे आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. उद्योजकता, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्य

यांना एकत्रितपणे ज्ञान असं संबोधतात. भविष्यकाळातलं तंत्रज्ञान आणि त्याद्वारे मिळणारं ज्ञान हे महत्त्वाचं असून कोणत्याही देशाचं भविष्य त्याच्याकडे असलेल्या भविष्यकाळातल्या तंत्रज्ञानावर अवलंबून असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

सदनिका घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांची आमदारकी कायम राहणार आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना आमदार म्हणून अपात्र ठरवलं जाणार नाही, असं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस जारी केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे दोषी ठरले होते. या प्रकरणात त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली होती, मात्र शिक्षा कायम ठेवली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><><>**

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानग्या दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी २०२३ सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. पोलिसांनी याबाबतीत एफआयआर दाखल करावा असा आदेश न्यायालयाने देण्यासाठी कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळल्याचं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सशस्त्रदलांनी काल मोठी कारवाई करून नक्षलवाद्यांचा एक शस्त्रास्त्रांचा कारखाना उद्ध्वस्त केला. या कारवाईदरम्यान ८ सिंगल शॉट रायफल्स, मोठ्या प्रमाणात स्फोटकं आणि शस्त्रास्त्रं तयार करण्यासाठीची उपकरणं आणि सामान जप्त करण्यात आलं. केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलानं गुप्त माहितीच्या आधारे मीनागट्टा परिसरातलं जंगल आणि डोंगराळ भागात शोधमोहीम राबवली आणि हा कारखाना शोधून उद्ध्वस्त केला.

**<><><><><>**

दिल्लीहून आज पहाटे मुंबईकडे येणाऱ्या एअरइंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते माघारी वळवून दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आलं. विमानातले  प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुखरूप उतरवण्यात आल्याची माहिती एअरइंडियाच्या प्रवक्त्यानं दिली आहे. दिल्ली विमानतळावरुन उड्डाण केल्यानंतर थोड्याच वेळात वैमानिकाला इंजिनात बिघाड आढळल्यामुळे एअर इंडियाने पहाटे ६ वाजून ४० मिनिटांनी आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली आणि विमानाला परत बोलावण्यात आलं.  सध्या विमानाची कसून तपासणी सुरु आहे. दरम्यान एअर इंडियाने या प्रवाशांसाठी उपाहाराची तसेच  दुसऱ्या विमानाने मुंबईकडे पाठवण्याची व्यवस्था केल्याचं प्रवक्त्याने सांगितलं.

नागरी वाहतुक मंत्रालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी करायचे आदेश नागरी वाहतूक महासंचालनालयाला दिले आहेत.

**<><><><><>**

धाराशिवच्या लोकसेवा समितीच्या वतीनं समाजसेवा क्षेत्रात दिले जाणारे मराठवाडास्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारांचं हे १६वं वर्ष असून यंदाच्या विजेत्यांमधे अंबाजोगाई इथल्या  ज्ञानप्रबोधिनीचे  प्रसाद मधुकरराव चिक्षे तसंच धाराशिव जिल्हा परिसरात पालावरची शाळा चालवणारे चंद्रशेखर बाबुराव

पाटील  तसंच लातूरमधल्या  मातोश्री वृद्धाश्रमाचा समावेश आहे. माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेय़ी यांच्या स्मरणार्थ हे पुरस्कार दिले जातात.

**<><><><><>**

थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त आज राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात येत आहे. शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि अकादमिक मंचांवर गणिताचे वैज्ञानिक प्रगती आणि दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. रामानुजन यांच्या सन्मानार्थ सरकारने २०११ मध्ये २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २०१२ हे वर्ष देशात राष्ट्रीय गणित वर्ष म्हणून साजरे करण्यात आले.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारतीय संघानं काल रात्री विशाखापट्टणममध्ये झालेल्या पहिल्या T20 आंतरराष्ट्रीय सामन्यात श्रीलंकेला आठ गडी राखून पराभूत करत पाच सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. विजयासाठीचं १२२ धावांचं लक्ष्य भारताने १४ षटक आणि ४ चेंडूत पूर्ण केलं.  ४४ चेंडूत ६९धावा करणारी जेमिमा रोड्रिग्ज सामनावीर ठरली.

**//<><><><><>//**